# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**आणि**

## कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय

गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

या संस्थातील

# सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

२० जुलै, २०१८

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2018 TG 927582

दि. 19 JUL 2018 वि.क्र. 98230 मुद्रांक शुल्क रक्कम 100

दस्त नोंद करणार आहे का -होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि.कार्या---

दस्ताचा प्रकार- कारण- बँक/कर्ज/हमीपत्र/करारपत्र/प्रतिज्ञापत्र/व.मु./पार्टनरशिप/संमत्तीपत्र

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव- सुधीर चिंतामणी जोशी रा. कोल्हापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता---

हस्ते नांव व पत्ता---

मोबदला रक्कम मिळकतीचे वर्णन---

मुद्रांक विक्रेत्याची सही-

परवाना तसेच मुद्रांक विक्रीचे ठिकाण व पत्ता–सौ. जयश्री महेश धाडणकर (स्टॅम्प व्हेंडर)
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही– लाय. क्र. ७/२००३ कोड नं. २६०१०३०
२४६८'ए' वॉर्ड, वरूणतीर्थ वेश, कोल्हापूर.

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर**

**आणि**

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

**शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर**

'शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे.

मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविधि स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादीत ग्रंथांना पारितोषिके दिले जाते. संघामार्फत **'शिविम संशोधन पत्रिका'** हे विद्वत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No. २३१९-६०२५ असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समामेश केलेला आहे

वरील नमुद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. २० जुलै २०१८ रोजी करत आहेत.

या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दष्टये :-**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वंक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करण.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रिता शोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथांचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना या संदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे :-**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थांडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकद्वारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी :-**

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नूतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३. कोणत्याही महाविद्यालयास प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय :-**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. खालील स्वाक्षरांच्या सदरहू वपरस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

प्रा. सुधीर जोशी — प्रमुख, मराठी विभाग

डॉ. एस. वाय. कोतमिरे — प्राचार्य

प्राचार्य
शिवराज महाविद्यालय,
साहित्य, वाणिज्य आणि डी.एस.कदम
विज्ञान, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

डॉ. प्रकाश दुकळे — सचिव

डॉ. शिवकुमार सोनाळकर — अध्यक्ष

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

प्रा. डॉ. एम. व्ही. राजे

प्रा. डॉ. ए.बी. कुंभार

प्रा. ए. के. मोरमारे